MHMM180118562024

| | |
|---|---|
| खटला दाखल दिनांक | १४.१०.२०२४ |
| खटला नोंदणी दिनांक | १४.१०.२०२४ |
| निकाल दिल्याचा दिनांक | ०५.११.२०२४ |
| कालावधी | ०० वर्षे ०० महिने २१ दिवस |

**निशाणी क्रमांकः ०६**

## अति.मुख्य न्याय दंडाधिकारी यांचे ०९ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.

## (पीठासीन अधिकारी अे.के.आवारी )

## ( न्यायनिर्णय फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५५ प्रमाणे )

| | | |
|---|---|---|
| १ खटल्याचा अनुक्रमांक | : | **२७८४/पी.डब्ल्यू./२०२४** |
| २ अपराध घडल्याचा दिनांक | : | दिनांक ११/०८/२०२४ ते १३/०८/२०२४ चे दरम्यान |
| ३ अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र राज्य द्वारा पोलिस अधिकारी, (माहिम पोलिस ठाणे) गुन्हा क्रमांक ४२३/२०२४ |
| ४ आरोपीचे विवरण | | **अजित अर्जुन पिल्लई ,** वयः ३८ वर्षे, व्यवसाय– काही नाही रा.ठि.:रूम नं. ६७३/४३९७, गुजरात हाऊसिंग बोर्ड, ए.बी.विद्यालय जवळ, बापू नगर, अहमदाबाद, गुजरात |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | तक्रारीचे किंवा अपराध झाल्याचे कलम | : | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) |
| ६ | आरोपीचा जबाब व त्याची तपासणी | : | आरोपीने गुन्हा नाकबुल केला |
| ७ | अंतिम आदेश | : | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |
| ८ | आदेशाचा दिनांक | : | ०५/११/२०२४ |

अभियोग पक्षातर्फे वकिल – सहाय्यक शासकीय अभियोक्ता श्री. जोशी

आरोपीतर्फे वकिल – ॲड. श्री.पी.पी.खोत

**न्या य नि र्ण य**

(दिनांक ०५.११.२०२४ रोजी पारीत)

१. प्रस्तुत प्रकरणात आरोपीवर भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) अन्वये दोषारोपत्र सादर करण्यात आलेले आहेत.

२. अभियोग पक्षाचे घटनेसंदर्भात थोडक्यात म्हणणे असे की फिर्यादी राजन अनंत चव्हाण यांचे सलुनचे दुकान असून ते दुकान क्रमांक ४, गांधी हाउस, एल्.जे.रोड, माहिम, मुंबई या ठिकाणी आहे. फिर्यादी यांचे दुकान मंगळवार ते रविवार सकाळी ०८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत चालू असते. दिनांक ११/०८/२०२४ रोजी रात्री १०.०० वाजता फिर्यादी यांनी दुकान व्यवस्थित लॉक लावून बंद केले. तसेच दिनांक

१२/०८/२०२४ रोजी सोमवार असल्याने दुकान बंद होते. फिर्यादी दिनांक १३/०८/२०२४ रोजी सकाळी ०७.३० वाजताचे सुमारास दुकानाचे पाठीमागील चाळीतील भुषण पोळेकर यांनी फिर्यादी यांना मोबाईलवर फोन करून कळविले की त्यांचे सलुनचे दुकानाचे शटर अर्धवट उघडे आहे. तेव्हा फिर्यादी यांनी लगेच त्यांचा पुतण्या चिन्मेश चव्हाण यांस घडलेला प्रकार फोन करून सांगितला. त्यानंतर ते दोघे त्या ठिकाणी पोहचले असता त्यांना त्यांचे दुकानाचे शटरचे लॉक लावण्याचा कोयंडा तुटलेला दिसला. त्यानंतर फिर्यादी व त्यांचा पुतण्या यांनी दुकानात प्रवेश केला असता त्यांना शटरच्या आतील काचेचा दरवाजा उघडा दिसला तसेच दरवाजाच्या उजव्या बाजूस ठेवलेले लाकडी काऊंटर मधील ड्रॉवर उघडे असलेले व त्यातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तसेच फिर्यादी यांनी ड्रॉवरमधील कॅशबॉक्स मध्ये दुकानाचे रोजचा खर्च व इतर खर्चासाठी ठेवलेले रूपये ३०,०००/– त्यांना मिळून आले नाहीत. तेव्हा फिर्यादी यांची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात इसमाने रात्रीच्या वेळी दुकानाचे कोयंडे तोडून दुकानात प्रवेश करून वरील रक्कम चोरी केली. सबब फिर्यादीने पोलिस स्टेशन,माहिम येथे फिर्याद दिली.

३. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरूध्द गुन्हा क्रमांक ४२३/२०२४, कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली व पोलिस उपनिरिक्षक श्री. देवरे यांच्याकडे तपास सोपविण्यात आला.

४. तपासादरम्यान तपासीअधिका–यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच साक्षीदारांचे बयान नोंद केले. तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपीवर निशाणी–०२ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपीने दोषारोप नाकारुन संपरिक्षेची तयारी दर्शवीली.

६. एकंदर अभियोग पक्षाची हकीकत व पुराव्यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | **<u>मुद्दे</u>** | **<u>कारणमिमांसा</u>** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय, की,दिनांक ११/०८/२०२४ रोजी २२.०० वाजता ते १३/०८/२०२४ ७.३० वाजताचे दरम्यान एल्. जे. रोड , गांधी हाउस बिल्डींगमधील शॉप नं.०४ तसेच पहिल्या माळयावरील रुम नं.०६, व ०८ माहिम(प), मुंबई, या ठिकाणी आरोपीने कारावासाच्या शिक्षेस पात्र असा अपराध करण्याच्या इराद्याने फिर्यादी यांच्या सलुन/दुकानात चोरटे गृहअतिक्रमण केल्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३३१(३)प्रमाणे अपराध केलेला आहे काय ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय, की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने कारावासाच्या शिक्षेस | **नाही.** |

.. ५..

| | | |
|---|---|---|
| | पात्र असा अपराध करण्याच्या इराद्याने फिर्यादी यांच्या सलून/दुकानात रात्रीच्या वेळी चोरटे गृहअतिक्रमण केल्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३३१(४) प्रमाणे अपराध केलेला आहे काय ? | |
| ३. | अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला काय, की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांच्या सलून/दुकानात कडी कोयंडा तोडून प्रवेश करून काऊंटरवरील कॅशबॉक्स मधून रूपये ३०,०००/ चोरुन नेल्याने भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ ) प्रमाणे अपराध केलेला आहे काय ? | **नाही.** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

**-: <u>का र णे मि मां सा</u> :-**

७. अभियोग पक्षातर्फे फक्त एकच साक्षीदार तपासण्यात आला. राजन अनंत चव्हाण , फिर्यादी यांची साक्ष निशाणी-०४ अन्वये नोंदविण्यात आली. अभियोग पक्षातर्फे फिर्याद निशाणी क्रमांक-०५ सिध्द केला गेला तसेच घटनास्थळ पंचनामा निशाणी क्रमांक-०६ वर दाखल आहे. फिर्यादीच्या साक्षीवरुन आरोपीविरुध्द गुन्हयात गोवणारा पुरावा संचिकेवर न आल्याने आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम ३५१ नुसार जबानी नोंदविण्यात आली नाही.

८. अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्त्यांचा व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता:</u>

९.　　सदर प्रकरणात आरोपीविरुध्द त्याने फिर्यादीच्या मालकीच्या मातृछाया सलूनचे कोयंडे तोडून दुकानात गैर मार्गाने प्रवेश करुन दुकानातील तीस हजार रुपये रोख रकमेची चोरी केल्याचा दोषारोप आहे. त्यामुळे गुन्हा सिध्दतेच्या दृष्टीने आरोपीने अशा पध्दतीचे कृत्य केले अथवा नाही या मुद्दयावरील पुरावा अत्यंत महत्वाचा आहे.

१०.　　हे येथे नमुद करणे महत्वाचे की प्रस्तूत प्रकरणातील फिर्याद निशाणी-०५ ही अज्ञात व्यक्ती विरुध्द दाखल आहे. त्यामुळे सदर अज्ञात व्यक्ती हा प्रस्तुत आरोपीच असल्याचे सिध्द करणे अभियोग पक्षावर बंधनकारक आहे. राजन चव्हाण, फिर्यादी याने त्याच्या पुराव्यात दिनांक ११/०८/२०२४ ला रात्री दूकान बंद केले व दिनांक १३/०८/२०२४ ला त्याला सकाळी ७.३० वाजता भुषण पुळेकर याच्या फोनवरुन दुकानाचे शटर अर्धवट उघडे असल्याचे कळले. तो तेथे पोहचला असता त्यास दुकानातील वस्तू अस्ताव्यस्त तर ड्रॉवरमध्ये ठेवलेले रुपये २८,०००/- ते ३०,०००/- आढळून न आल्याचे तो सांगतो. त्यानुसार त्याने फिर्याद, निशाणी-०५ दाखल केली. परंतू आरोपीस अटक केल्यानंतर प्रस्तुत आरोपीकडून कुठलाही मुद्देमाल जप्त केला गेला नाही. त्याचप्रमाणे तपासीअधिका-याने तयार केलेल्या पंचनाम्यावरुन देखील आरोपीचा प्रत्यक्ष गुन्हयात कुठलाही सहभाग देखील आढळून येत नाही. एकीकडे दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता तपासीअधिकारी स्पष्ट करतो की आरोपीने गुन्हयातल्या मालमत्ते संदर्भात

निवेदन करण्याची इच्छा व्यक्त केल्याने निवेदन पंचनामा तयार केला गेला व त्याचे व्हिडीओ चित्रीकरण देखील करण्यात आले. किंबहूना असे कोणतेही व्हिडीओ चित्रीकरण संचिकेवर दाखल नाही. तसेच साक्षीदारांच्या यादीत उल्लेख केलेल्या सोहेल मोहम्मद रफीक शेख व मोहम्मद मुस्तफा मोईनुद्दीन गुंजी यांचे देखील बयाण संचिकेवर दाखल नाही. त्यामुळे सदर व्यक्ती हया नेमक्या कोणत्या मुद्दयावरील साक्षीदार आहेत याचा देखील बोध होत नाही. अशा परिस्थितीत उपलब्ध पुराव्याच्या आधारे आरोपीचा प्रस्तुत गुन्हयामध्ये कुठलाही सहभाग न आढळून येत असल्याने त्याच्या विरुध्दचा दोषारोप सिध्द होणे अशक्यप्राय आहे. सबब अशा त्रोटक पुराव्याच्या आधारे आरोपी विरुध्दचा गुन्हा अभियोग पक्ष सिध्द करु शकत नाही. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे नकारार्थी उत्तर नोंदवितो व आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मी क्रमप्राप्त समजतो. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **अजित अर्जुन पिल्लई** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ कलम २७१(१) अन्वये भारतीय न्याय संहिता,२०२३ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५(अ) या आरोपांतून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी हा कारागृहात न्यायबंदी आहे. त्याची इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास त्वरीत मुक्ताता करण्यात यावी. कारागृह प्रशासनास याबाबत लेखी पत्रद्वारे कळविण्यात यावे.

३. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ कलम ४८१(अ) मधील तरतूदींप्रमाणे पुर्तता करावी.

४. न्यायनिर्णयाची प्रत भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ कलम ४०६ अन्वये पुढील पुर्तता करण्यासाठी संबंधित जिल्हादंडाधिकारी यांना अग्रेषीत करण्यात यावी.

(न्यायनिर्णय न्यायालयात संगणकावर श्रुतलिखीत व घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ASHISH KESHAORAO AWARI
Date: 2024.11.06 15:55:21 +0530

**( अे.के.आवारी )**
अति.मुख्य न्याय दंडाधिकारी
०९ वे न्यायालय, बांद्रा , मुंबई

दिनांक :– ०५.११.२०२४
*विनिहा.

श्रुतलिखित केल्याचा दिनांक : ०५/११/२०२४
टंकलिखीत केल्याचा दिनांक : ०५/११/२०२४
स्वाक्षरी केल्याचा दिनांक : ०५/११/२०२४